# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
## (सचिवालय)

**प्रस्तावना :-** नागपूर महानगरपालिका, नागपूर अंतर्गत महाल येथील जुन्या टॉऊन
**{प्रकल्प विभाग}** हॉलच्या जागेवर श्रीमंत राजे रघुजीराव भोसले नविन टॉऊन हॉलचे बांधकाम करण्याकरीता तत्कालीन मा. आयुक्त यांनी दि. 20/09/2019 रोजीला प्रकल्प सल्लागार म्हणून M/s. CEPL-SC2IPL Joint Venture Pune यांची नियुक्ती विशेष बाब म्हणून मा. स्थायी समीती यांची मान्यता घेऊन 2.98% दरावर 18% (GST) वगळून मंजूर करून मान्यता प्रदान केली होती. परंतु उपरोक्त कामास शासनाची निधी अप्राप्त असल्यामुळे मा. स्थायी समीती यांच्याकडे सादर करण्यात आले नसल्याने प्रकल्प सल्लागार यांना कार्यादेश निर्गमित करण्यात आले नाही. तथापी सदर कामाची प्रशासकीय मान्यता दि. 30/01/2024 रोजी प्राप्त झालेले असून व मा. मुख्य अभियंता यांनी सादर केल्याप्रमाणे Pre-Tender Activity करीता सदर कामाचे प्रकल्प सल्लागार यांनी सदर कामाच्या हितार्थ निविदा पुर्व प्रक्रिया पुर्ण केल्यामुळे व तत्कालीन मा. आयुक्त यांनी मंजूरी प्रदान केल्यानुसार यांना 0.745 % मंजूर दराला कार्यारंभ आदेश निर्गमित करणेकरीता मा. आयुक्त तथा प्रशासक यांनी दि. 22/04/2024 रोजीला मंजूरी प्रदान केली आहे.

करीता M/s. CEPL-SC2IPL Joint Venture Pune यांची 0.745% दरास मंजूरी प्रदान करून Pre-Tender Activity चे कार्यरंभ आदेश निर्गमित करण्याचा प्रश्न विचारात घेणे.

सहपत्र :- 1) सदर कामाचा शासन खर्च पद क्र. A42001361002.
2) विस्तृत टिप्पणी नस्तीत संलग्न आहे.

## पारीत ठराव

**ठराव क्रमांक :- 868/स्थायी समिती/प्रशासक** **दिनांक :- 15/06/2024**

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार कार्यकारी अभियंता (प्रकल्प - 3), प्रकल्प विभाग यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार नागपूर महानगरपालिका, नागपूर अंतर्गत महाल येथील जुन्या टॉऊन हॉलच्या जागेवर श्रीमंत राजे रघुजीराव भोसले नविन टॉऊन हॉलचे बांधकाम करण्याकरीता तत्कालीन मा. आयुक्त यांनी दि. 20/09/2019 रोजीला प्रकल्प सल्लागार म्हणून M/s. CEPL-SC2IPL Joint Venture Pune यांची नियुक्ती विशेष बाब म्हणून मा. स्थायी समीती यांची मान्यता घेऊन 2.98% दरावर 18% (GST) वगळून मंजूर करून मान्यता प्रदान केली होती. परंतु उपरोक्त कामास शासनाची निधी अप्राप्त असल्यामुळे मा. स्थायी समीती यांच्याकडे सादर करण्यात आले नसल्याने प्रकल्प सल्लागार यांना कार्यादेश निर्गमित करण्यात आले नाही. तथापी सदर कामाची प्रशासकीय मान्यता दि. 30/01/2024 रोजी प्राप्त झालेले असून व मा. मुख्य अभियंता यांनी सादर केल्याप्रमाणे Pre-Tender Activity करीता सदर कामाचे प्रकल्प सल्लागार यांनी सदर कामाच्या हितार्थ निविदा पुर्व प्रक्रिया पुर्ण केल्यामुळे व तत्कालीन मा. आयुक्त यांनी मंजूरी प्रदान केल्यानुसार यांना 0.745 % मंजूर दराला कार्यारंभ आदेश निर्गमित करणेकरीता मा. आयुक्त तथा प्रशासक यांनी दि. 22/04/2024 रोजीला मंजूरी प्रदान केली आहे.

करीता M/s. CEPL-SC2IPL Joint Venture Pune यांची 0.745% दरास मंजूरी प्रदान करून Pre-Tender Activity चे कार्यरंभ आदेश निर्गमित करण्याच्या प्रस्तावास मा. प्रशासक यांनी मान्यता प्रदान केली.